# भटक्या - विमुक्तजमातीतील वंजारी समाज- एक अभ्यास :

**प्रा. बी.एस. केंद्रे**
*अर्थशास्त्र विभाग,*
*महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय,मुखेड*

*संपुर्ण भारतात विखुरलेली परंतु काही राज्यांत अनुसुचितजमात तर काही राज्यात अनुसुची बाहेर असलेली ही एके काळची भटकी जमात. यांची वस्ती प्रामुख्याने राजस्थान, आंध्रप्रदेश, ओरिसा, कर्नाटक, तामिळनाडू, पंजाब, बिहार, मध्यप्रदेश, महाराष्ट्र व हरयाणा राज्यात आढळते. भटक्याविमुक्तजाती-जमातीचा एक अविभाज्य घटक म्हणुन वंजारी समाज संपुर्ण भारतात कमी-जास्त प्रमाणात दिसुन येतो. विशेषतः महाराष्ट्रामध्ये या समाजाची लोकसंख्या जास्त आहे. महाराष्ट्रात हा समाज बीड, उस्मानाबाद, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, वाशिम, यवतमाळ, अमरावती, बुलढाणा, नंदुरबार, औरंगाबाद, जळगाव, अहमदनगर, नाशिक, धुळे, अकोला इ. जिल्हयात मोठया प्रमाणावर आहे.*

*वंजारी समाज हा मुळातच भटका असल्यामुळे महाराष्ट्रात हा समाज बहुतांश करुन डोंगराळ भागाततर काही प्रमाणात सपाट भागामध्येतांडे, वस्ती, वाडी व गावच्या रुपाने स्थिरावलेला दिसुन येतो.*

*वंजारी समाजाचा मुख्य व्यवसाय शेती, पशुपालन, शेतीपुरक व्यवसाय व मजुरी, उसतोडणी हे आहेत. अलिकडील काळात यात बदल होताना दिसुन येतो. वंजारी समाज मुळतः डोंगराळ, माळरान व नापीक जमीनीवर स्थिरावलेला असल्याने त्यांची शेती ही कोरडवाहु स्वरुपाची आहे. शेतीतील हंगाम संपताच हा समाज कामाच्या शोधात भटकंतीकरतो. मिळेल ते काम तो स्विकारतो उदा. उसतोडणी, हमाली, माथाडी कामगार म्हणुन संपुर्ण महाराष्ट्रभर भटकंती करतो. प्रसंगी महाराष्ट्रा बाहेर ही रोजगाराच्या शोधात भटकंती करित असतो.*

*महाराष्ट्रातील वंजारी समाजाचे रितीरिवाज, रहाणीमान, खानपान, रुढी परंपरा आणि संस्कृती जवळपास हिंदु, मराठा समाजाप्रमाणेच दिसुन येते. त्यांची बोलीभाषा मराठी आहे. वंजारी समाजातील पुरुष बारबंडी शर्ट, धोतर, फेटा, पागोटा, टोपी घालतात तर स्त्रिया नऊवारी पातळ, लुगडे, चोळी, झंपर, पाचवारी पातळ नेसतात. महिला कपाळावर गोल कुंकु-हळद लावतात.*

*काळाच्या ओघात अलिकडीत काळात वंजारी समाजातील स्त्री-पुरुषांच्या राहणीमानात बदल होत असुन ते आधुनिक पध्दतीचे वस्त्र-परिधानकरित आहेत.*

### *वंजारी समाजाची उत्पत्ती :*

*वंजारीजातीची उत्पत्ती वेगवेगळया प्रकारे सांगितलेली आहे.कारण वंजारी समाज विविध प्रांतात, प्रदेशात विविधनावाने ओळखला जातो.जसे वनजारी, वनजार, वनजारे, वंजारे, वंजारी, वनजारा, वंजारा, बनजारा, बंजारी, ब्रिजारी, चारण इ. म्हणुन वंजारी शब्दाची उत्पत्ती पाहणे आवश्यक आहे.*

**१) वन+ ज + अरी :-**

*वन म्हणजे जंगल किंवा अरण्यतर ज हा संस्कृतधातु यावरुनजन्म म्हणजे जन्मलेले आणि अरी म्हणजे शत्रु, दुश्मन तेंव्हा वनजारी म्हणजे वनातीलक्रुर पशु, श्वापदांशी शत्रुत्व असलेला समाज होय.*

**२) वजन+ अरि :-**

*जंगली जनावरांचे शत्रु, वनज म्हणजे रानटीजनावरे, सिंहास वनज म्हणतात. त्यास वनराज म्हणतात. अशा जनावरांचा नाश करणारे त्यांच्याशी शत्रुत्व करणारे जे ते वनजारी अशी ही उत्पत्ती आहे.*

**३) वाणिज्यकार :-**

*वाणिज्य म्हणजे व्यापारकार म्हणजे करणारा म्हणजेच व्यापार करणारा असा तो वनजारी.*

**४) वनज+ र :-**

वजन हा गुजराथी भाषेतील शब्दत्यास र हे उपपद लागुन वनजर असे रुप झाले. या शब्दाचा अर्थ होतो.तांडा तेंव्हा पध्दतीने राहणारा, वागणारा, फिरणारा तो वनजर+इ प्रत्यय लागुन वनजारी हा शब्दत्या प्रांती रुढ झाला.

**५) वनजारा म्हणजे व्यापारी :-**

वनजारा हा पंजाबी भाषेतील शब्दत्याचा अर्थ व्यापारी असा होतो. पंजाब मध्ये या समाजास वनजारा किंवा वंजारा असे म्हणतात.

**६) वनिज-वनिजरो व्यापारकरणारा :-**

वनिज हा शब्दसिंधी भाषेतील आहे. वनिजरो असे रुप होवुन त्याचा अर्थ व्यापारकरणारा व्यापारी असा होतो.

**७) वनजा-व्यापार :-**

वनजा म्हणजे व्यापार या शब्दावरुन वनजारी हा धंदेवाचक शब्द रुढ झाला आहे.

यावरुन असेस्पष्ट होते की, वंजारीजातीचे लोक व्यापाराशी संबंधीत आहेत.

**वंजारीजातीची व्याख्या-अर्थ :**

वंजारीजातीची व्याख्या करणे अवघड काम आहे.कारण वंजारी समाज हा संपुर्ण भारतभर विखुरलेला आहे. प्रांतानुसार रुढी परंपरा, रितीरिवाज, संस्कृती, भाषा, राहणीमान यात बरिच भिन्नता दिसुन येते. महाराष्ट्रात राहणा-या वंजारीजातीच्या काही गुणवैशिष्टयांवरुन अनेक तज्ञांनी या जातीचा अर्थ पुढील प्रमाणे सांगितलेला आहे.

**१) बीड जिल्हा गॅझेटिअर १९६९ :-**

लमाण या जातीप्रमाणेच वंजारीजात सुध्दा राज्याच्या वेगवेळया भागात आढळुन येणारी आहे. वंजारी हा शब्द व्यापार या शब्दाशी जोडलेला आहे. वंजारी ही जात सैन्यासाठी धान्यादी आवश्यक वस्तुंची वाहतुक बैलाच्या पाठीवरुन करत असे.

**२) अॅड.जायेभाये बी.आर. :-**

वंजारी म्हणजे वनात राहणारा, कोणसही नघाबरणारा, धाडसी, रागीट, वाघ, सिंह व अन्य वनात राहणा-या हिंस्त्र जंगली जनावरांचा नाश करणारा, त्यांना पळवुन लावणारा तसेच युध्दाच्या काळात शेकडो-हजार मैल भटकत बैलाच्या सहाय्याने सैन्यास अन्नधान्य पुरवठा करणारा, व्यापार करणारा व मवाळकिचा, प्रेमळ, दिसायला उच्च वर्णिय मुळचा राजस्थानातुन आलेला असा हा वंजारी समाज होय.

**३) डॉ. कि.का.चौधरी :-**

वंजारी म्हणजे पिढयानपिढया स्थायी होऊन शेतीकरणारे, राहणीमान, पोशाख व बोलीभाषा मराठाकुणब्या प्रमाणे असणारे देवपुजा, वृक्षपुजा करणारे आणि विवाह संस्कार वैदक पध्दतीने करणा-या समाजाला वंजारी समाज असे म्हणतात.

**४) डॉ.राजेंद्र वाघ :-**

वंजारी समाज संपुर्ण भारतात आहे. वंजारी म्हणजे वनात वास्तव्य करणारा, वनात काम करणारा, व्यापारासाठी इकडुन-तकडे वनवन भटकणारा, काबाड-कष्ट करणारा समाज होय.

**५) महादेवशास्त्री जोशी :-**

वंजारी या जातीचे लोक भारतात सर्वत्र आढळतात. निरनिराळया प्रदेशातत्यांना निरनिराळी नावे आहेत. ती अशी बंजारी, ब्रिजारी, लमाणी, लंबाडी, लमाण, मथुरिया, चारणइ. पुर्वि यांचा मुख्य व्यवसाय बैलाच्या पाठीवरुन धान्यादी माल वाहुन नेण्याचा-आणण्याचा असला तरी पण आताते स्थायिक झाले असुन शेती, पशुपालन, लाकडे व गवत यांचा व्यापार इ. उद्योगकरु लागले आहेत. या जामातीतले बरेच लोक पुर्वी गैरमार्गाने (चोरी-लुटमार) आपला गुजाराकरित. ते भवानी, बहिरोबा, खंडोबाचे उपासक आहेत.

थोडक्यात वंजारी समाजाच्या व्याख्या वरुन असेदिसुन येतेकी, वंजारी समाज हा संपुर्ण भारतभर विखुरलेला असुन विशेषतः महाराष्ट्रात यांचे प्रमाण सर्वाधिक आहे. हा समाज आपल्या भटकंतीच्या काळात व्यापार, व्यवसाय,करुनधान्यादी वस्तुंची ने-आण करत होता. युध्दकाळात सैन्यासाठी रसद पुरवठाकरित असत.परंतु कालांतराने हा व्यवसाय बंद पडला. तेंव्हा वंजारी समाज वेगवेगळया प्रदेशात स्थाईक झाला. मग तो शेती, पशुपालन, शेतीपुरक व्यवसाय, मजुरीकरुन तो आपला उदरनिर्वाह भागवु लागला. स्थानिक संस्कृतीशीतो मिळुन -मिसळुन राहु लागला. त्यामुळे त्यांच्यात आणि महाराष्ट्रातील मराठाजातीच्या लोकांत फारसा फरकदिसुन येत नाही.

**संदर्भ :**

१. महाराष्ट्रातील वंजारी समाज : डॉ.वसंत मुंडे
२. वनजारी-बनजारीखंड-१ : आंधळे पी.के.
३. महाराष्ट्र शब्दकोष : दातेकर्वे (संपादीत)
४. महाराष्ट्र राज्यगॅझेटिअर : डॉ.चौधरीकि.का. (संपा.)